# विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, अमरावती
## टोपे नगर, अमरावती

दूरध्वनी : [illegible]    फॅक्स क्र. [illegible]

E-mail Id : [illegible]@gmail.com


क्र. शिउस/प्राथ क/स्वयंअर्थ/ २०१६

दिनांक :- 2[illegible] JUL 2016

प्रति,

अध्यक्ष/सचिव

विद्या संस्कार एज्युकेशन सोसायटी के. ऑफ खंडेलवाल मेडीकल जयस्तंभ चौक, परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती

**विषय :-** **सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.**

**संदर्भ :-** **१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२**

**२. महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. एसएफएस-२०१६/प्र.क्र. ६१/एसएम-२ मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १७ जून, २०१६.**

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्याकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | विद्या संस्कार एज्युकेशन सोसायटी के. ऑफ खंडेलवाल मेडीकल जयस्तंभ चौक, परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती | संस्कार इंटरनॅशनल सर्वे नं. ११ १ड, अष्टमासिध्दी मंदीरसमोर, कविठा रोड, मौजा नारायणपूर (परतवाडा) ता. अचलपूर जि. अमरावती | इंग्रजी | नवीन शाळा | इयत्ता- १ ली ते ८ वी | २०१६-१७ |

अटी व शर्ती :

१) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

२) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.

३) या अधिनियमातील तरतुदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून असेल.

PRINCIPAL
SANSKAR INTERNATIONAL SCHOOL
PARATWADA
CBSE AFFILIATION NO.1130780

४) शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे, त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

५) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

६) ज्या व्यवस्थापन सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

७) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इ. शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस **मान्यता (Recognition)** घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) यांचे कडुन मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

८) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) मुख्य अधिनियम, २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

९) शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वंयअर्थसहाय्यित तत्तवावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील व वेळोवेळी करण्यात येणाऱ्या पत्रव्यवहारावर स्वयंअर्थसहाय्यित शाळा/वर्ग असे लिहिणे बंधनकारक राहील.

१०) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

११) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतूदींची पूर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्र. ३ परिशिष्ट २ मधील विहीत नमून्यात एक महिण्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

१२) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

(एस. बी. कुलकर्णी),
शिक्षण उपसंचालक,
अमरावती विभाग, अमरावती

प्रतिलिपी :

१. मा. अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना माहितीस सादर.

३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. अमरावती यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

PRINCIPAL
SANSKAR INTERNATIONAL SCHOOL
PARATWADA
CBSE AFFILIATION NO.1130780

**विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालय, अमरावती**
**टोपे नगर, अमरावती**
दुरध्वनी - ०७२१-२५५३६०४ फॅक्स क्र. ०७२१-२५५३६४२
E-mail Id : dydamt@gmail.com

क्र. शिउस/माध्य/ क/स्वंअशाप/ ९५६८ /२०१६
दिनांक:- 22 JUL 2016

प्रति,

अध्यक्ष/सचिव
विद्या संस्कार एज्युकेशन सोसायटी के. ऑफ खंडेलवाल मेडीकल जयस्तंभ चौक,
परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती

**विषय:-** **सन २०१६-२०१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.**

**संदर्भ :-** **१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२**
**२. महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचा शासन निर्णय क्र. एसएफएस-१०१६/प्र.क्र. ६९/एसएम-२/मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १७ जून, २०१६.**

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जा वाढ करण्याकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | विद्या संस्कार एज्युकेशन सोसायटी के. ऑफ खंडेलवाल मेडीकल जयस्तंभ चौक, परतवाडा ता. अचलपूर जि. अमरावती | संस्कार इंटरनॅशनल सर्वे नं. १९/१ब, अष्टमासिध्दी मंदीरसमोर, कविठा रोड, मौजा नारायणपूर (परतवाडा) ता. अचलपूर जि. अमरावती | इंग्रजी | नवीन शाळा | इयत्ता- ९ वी ते १० वी | २०१६-१७ |

अटी व शर्ती :

१) संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

२) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.

३) या अधिनियमातील तरतूदीनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून असेल.

PRINCIPAL
SANSKAR INTERNATIONAL SCHOOL
PARATWADA
CBSE AFFILIATION NO.1130780

४) शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे, त्या वर्गाव्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.

५) ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी **शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

६) ज्या व्यवस्थापन सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

७) **सीबीएसई, आयसीएसई, आयबी,** आयजीसीएसई **आणि सीआयई** इ. शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस **मान्यता (Recognition)** घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता सदर शासन निर्णयातील **परिच्छेद** (१०) नुसार जिल्हा **शिक्षणाधिकारी** (प्राथमिक / माध्यमिक) यांचे कडुन मिळाल्यानंतर **मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

८) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) मुख्य अधिनियम, २०१३ मधील सर्व तरतुर्दीचे पालन करणे बंधनकारक राहील.

९) *शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्तवावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील व वेळोवेळी करण्यात येणाऱ्या पत्रव्यवहारावर स्वयंअर्थसहाय्यित शाळा/वर्ग असे लिहिणे बंधनकारक राहील.*

१०) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांची भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

११) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतूदींची पूर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्र. ३ परिशिष्ट २ मधील विहीत नमून्यात एक महिण्याच्या आत प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक राहील.

१२) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरतांना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

(एस. बी. कुलकर्णी) ,
शिक्षण उपसंचालक,
अमरावती विभाग, अमरावती

प्रतिलिपी :

१. मा. अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांना माहितीस सादर.
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. अमरावती यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

PRINCIPAL
SANSKAR INTERNATIONAL SCHOOL
PARATWADA
CBSE AFFILIATION NO.1130780